# अवादा फाउंडेशनच्या माध्यमातून विड्यात उभारलेल्या पाण्याच्या टाकीचे लोकार्पण

प्रतिनिधी | केज

अवादा फाउंडेशनच्या संचालिका रितु पतवारी यांच्या मार्गदर्शनाखाली सी.एस.आर उपक्रमांतर्गत विडा येथे उभारण्यात आलेल्या ८ हजार लिटर क्षमतेच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीचा लोकार्पण नूकतेच पार पडले आसून या माध्यमातून विडेकरांना आता स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी मिळण्यास मदत होणार आहे.

केज तालुक्यातील विडा येथे आवादा फाउंडेशनच्या संचालिका श्रीमती रितु पतवारी यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेल्या ८ हजार लिटर क्षमतेच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे लोकार्पन नूकतेच संपन्न झाले आहे.या पाण्याच्या टाकीमुळे विडेकरांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून, यामुळे जुन्या अस्वच्छतेच्या समस्यांपासून मोठा दिलासा मिळणार आहे.




अवादा फाउंडेशनच्या वतीने विडा येथे ८ हजार लिटर क्षमतेचा जलकुंभ उभारण्यात आला आहे.

फाउंडेशनच्या सामाजिक बांधिलकीचा एक भाग म्हणून राबवलेला हा उपक्रम विडेकरांनी अत्यंत आनंदाने स्वीकारला आहे.या टाकीचे लोकार्पन अवादा पवन ऊर्जा प्रकल्पाचे अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी पोलीस अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्य सांगू, बिनधास्त
दिव्य मराठी